पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/५२९/२०१३
दिनांक - ०७/०६/२०१३

प्रति,

मा......................................
सदस्य, शहर सुधारणा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची विशेष सभा दिनांक **११/०६/२०१३** रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची विशेष सभा मंगळवार दिनांक **११/०६/२०१३** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत -

१) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – १८.

मा.शहर सुधारणा समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - २**

दिनांक :- ११/०६/२०१३ वेळ - दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची विशेष सभा मंगळवार दिनांक **११/०६/२०१३** रोजी दुपारी **१२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक १) मा.क प्रभाग समिती सभा दि. ०७/०९/२०११ ठराव क्र.४२ नुसार, प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील हरित विभागातील क्षेत्र लगतच्या निवासी विभागासह यापुर्वी म.न.पा.चे नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट झाले आहे. तथापि गाव मौजे बो-हाडेवाडी येथील नविन गट नंबर ७५ व लगतचे क्षेत्र प्राधिकरणाने संपादन केलेले नाही. मात्र सदर क्षेत्र नजरचुकीने प्राधिकरणाचे नियंत्रणाखाली ठेवले गेले आहे. याठिकाणी विकास परवानगी घेणेसाठी जमीनधारक प्राधिकरणाकडे गेल्यास क्षेत्र म.न.पा.चे नियोजन नियंत्रणाखाली असल्याचे प्राधिकरणाकडून सांगण्यात येते व यापूर्वी म.न.पा.कडे आलेले क्षेत्रात या जागेचा समावेश नसल्याने म.न.पा. मार्फत विकास परवानगी देण्यात येत नाही. सबब असे सर्व क्षेत्राचा शोध घेऊन ते म.न.पा.चे नियोजन नियंत्रणात घेऊन म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन सदर क्षेत्राच्या झोन निश्चितीची कार्यवाही करावी. उक्त अधिनियमाचे कलम ३७ अन्वये करावयाच्या कार्यवाहीस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दिनांक ११.०६.२०१३ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक२) मनपाचे मौजे पिंपळे निलख येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील स.नं.६५ पै. ते ६७ पै. १८.०० मी. रस्त्याची आखणीमध्ये बदल करुन रस्त्याची रुंदी २४.०० मी. करणेबाबत म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये

फेरबदल करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक३) पिंपरी चिंचवड मनपाने मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजुर विकास योजनेतील मिळकती (मौजे पिंपळे निलख शिव ते वाकड चौक शाळा) ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी भुसंपादन करणेकामीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मंजुरीने मा.जिल्हाधिकारी यांना सादर केलेला आहे. प्रस्तावातील बाबी विचारात घेता भूसंपादन प्रक्रियेबाबत कायदेशीर गुंतागुंत टाळणेचे दृष्टीने मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजूर विकास योजनेतील मिळकती (मौजे पिंपळे निलख शिव ते वाकड शाळा चौक स.नं.२४२पै., २४४पै ते २४९ पै, २५१पै, २५७ पै ते २६३ पै, २६५ पै व २६६ पै, २६९ पै ते २७२ पै, २७६पै ते २७८पै.) ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी सदर जमिनीचे म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम १२६ मधील तरतूदीनुसार भूसंपादन करणेचे प्रस्तावास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ४) पिंपरी चिंचवड मनपाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विशेष नगर वसाहतीच्या नियमावली म.प्रा. व न.र अधि. १९६६च्या कलम ३७ (१ कक) अन्वये तरतुद समाविष्ट करणेकरीता शासनाने नोटीस जाहिर केली आहे. उपसंचालक नगररचना पुणे विभाग यांनी शासन सुचनेवर प्राप्त झालेल्या २५ हरकती पाठविल्या असुन सदर हरकती व शासन सुचना यावर पिंपरी चिंचवड महानगरलिकेच्या सर्वसाधारण सभेचे मत मागिवले असल्याने, त्याबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक५) पिंपरी चिंचवड मनपाचे सुधारित मंजूर विकास योजनेतील मौजे पिंपरी स.नं.७पै, २२४पै, २२५पै, या जागेवरील १८.०० मी.रुंद रस्त्याचे बाधितक्षेत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना भूसंपादन अधिनियम १९६६ चे कलम १२६ अन्वये भूसंपादन करुन मनपाच्या ताब्यात घेणे आवश्यक आहे. सदर रस्त्याचे भूसंपादनाचे खर्चास भूसंपादन अधिकारी कळवतील त्याप्रमाणे खर्चास मा.स्थायी

समितीची आवश्यकता असल्याने सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ६) पिंपरी चिंचवड मनपाच्या **JnNURM-BSUP** अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी राबविण्यात येणा-या **EWS** घरकुल योजनेअंतर्गत च-होली व डुडूळगांव येथे ११३४ घरे बांधणे प्रस्तावित असून त्यादृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे **DPR** मधील १३२५० घरापैकी चिखली येथील से.क्र.१७ व १९ मधील ६७२० घरे व च-होली व डुडूळगांव येथील ११३४ घरे असे एकूण ७८५४ घरांचे काम पुर्ण होईल. उर्वरीत ५३९६ घरे जागेअभावी व **JnNURM Mission** चा कालावधी मार्च २०१४ अखेर असल्यामुळे बांधणे शक्य नाही. या अनुषंगाने प्रकल्प ७८५४ सदनिकांपर्यंतच सिमित करणेबाबतचा सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल **(D.P.R.)** शासनाकडे पाठविणे आवश्यक असल्याने सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/४/कावि/५२९/२०१३
दिनांक - ०७/०६/२०१३.

टिप – प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.